| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**<br>**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१**<br>**Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in** | |

**प्रेसनोट ३०६/२०२२** **दिनांक : ०७/१०/२०२२**

# सराईत सोनसाखळी चोरास जेरबंद करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक ०३/१०/२०२२ रोजी १०.३० वा चे सुमारास विरार (पश्चिम) येथील ब्रिज समोर संजिवणी हॉस्पिटलकडे जाणारे रोडवर फिर्यादी महिला वय-४६ वर्षे, विरार पश्चिंम, ता. वसई, जि. पालघर या रस्त्याने पायी चालत जात असतांना एक मोटारसायकलवरुन अनोळखी इसम याने येवून फिर्यादी यांचे गळयातील २,२०,०००/- रूपये किंमतीचे साडेपाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने खेचुन चोरुन नेले होते. सदर घटनेबाबत विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ९०५/२०२२ भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणेकरिता पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे सदर गुन्हा उघडकीस आणणेकरीता गुन्हे शाखा कक्ष -३ चे वेगवेगळे पोलीस पथक तयार करुन आयुक्तालय परिसरात घडणारे चैन स्नॉचिंगचे विविध गुन्हयाचे अवलोकन करुन आरोपीत याने गुन्हयात वापरलेले वाहन तसेच आरोपीत याची गुन्हे करण्याची पध्दतीवरुन गुप्त बातमीदार याचे मार्फतीने माहिती मिळवुन आरोपीत नामे – मोहम्मद नझीर अहमद खान वय ४९ वर्षे, सध्या रा. मौजे महापोली, ता. भिवंडी, जि. ठाणे. मुळगाव पत्ता - आझाद नगर तलावाजवळ, जि. रायबरेली, राज्य उत्तर प्रदेश यास गुन्हयात वापरलेली मोटारसायकल, बनावट नंबर प्लेट, कॅप, हेल्मेट असा ७४,५५०/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन उक्त आरोपीत यांचे कडे प्राथमिक तपास करता खालील गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ९०५/२०२२ | भा.द.वि.स. कलम ३९२ प्रमाणे |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | १५८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |
| ३ | खारघर पोलीस ठाणे (नवी मुंबई ) | १५७/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ३९२ प्रमाणे |

नमुद आरोपीत याचा पुर्वईतिहास तपासुन पाहता त्याचेवर अशाच प्रकारे नेरुळ, खारघर व पनवेल येथे १० जबरी चोरीचे गुन्हे दाखल असुन उक्त आरोपीत यास पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) अती कार्य. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ अश्विन पाटील, पो.अं./ सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ तसेच विरार पोलीस ठाण्याचे पो.हवा/ संदिप शेरमाळे, पो.अं./ सुनिल पाटील, पो.अं/ युवराज वाघमोडे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---ooo---